निकष	गुण
भूतकाळ	7
वर्तमान	63
लोकमत	30
एकूण	**100**

या अंकाविषयी

मुंबई महानगरपालिकेच्या नगरसेवकांच्या प्रगती पुस्तकाची मोजपट्टी

PRAJA DIALOGUE

मार्च 2017 अंक 76

लक्षवेधी

"जे कामाला तयार आहेत त्यांच्याकडचे काढून, जे कामास तयार नाहीत त्यांना देत राहिले, तर लोकशाही मूल्ये लयास जातील."

- थॉमस जेफरसन

जेव्हा सर्व निर्वाचित लोकप्रतिनिधी, जनतेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी, सक्रीयपणे उपलब्ध घटनात्मक कार्यपद्धतींचा अवलंब करतील, आणि आवश्यक तेव्हा नव्या वा सुधारित कार्यपद्धती कार्यान्वित करतील, तेव्हाच आपल्या देशासारखी आधुनिक लोकशाही व्यवस्था प्रभावीपणे कार्यक्षम राहू शकेल.

मतदान प्रक्रियेतून नागरिक आपले लोकप्रतिनिधी निवडतात. या प्रकारे संसदीय सभागृहांमध्ये जनतेच्या प्रश्नांचे प्रतिनिधित्व करण्याचे अधिकार या लोकप्रतिनिधींना बहाल केले जातात. त्यांनी हे प्रश्न सोडवून समाजाची प्रगती साधण्यासाठी काम करणे अपेक्षित आहे. लोकप्रतिनिधींना मिळणारे हे अधिकार कायमस्वरूपी नसतात; जोवर त्यांच्या अधिकारांना आव्हान दिले जात नाही, वा अधिकारांचा संविधानिक कालावधी पूर्ण होत नाही, तोवरच लोकप्रतिनिधींना कामाचे अधिकार आहेत. तसेच नियमित होणाऱ्या निवडणूक प्रक्रियेतून जाऊन त्यांना आपले अधिकार पुन्हा संपादित करावे लागतात. या प्रकारे, लोकशाही म्हणजे सामान्य नागरिकावरील विश्वास आणि आपल्या मताधिकारातून लोकप्रतिनिधी निवड करण्याची आणि आवश्यकतेनुसार सक्रिय भूमिका निभावण्याची त्याची क्षमता, यांवरील विश्वास होय.

पण जेव्हा नागरिकांना आपल्या सक्रिय सहभागाचा विसर पडतो किंवा लोकप्रतिनीधी संविधानिक जबाबदारी विसरतात, तेव्हा लोकशाहीत भ्रष्ट्राचाराचा शिरकाव होतो. त्याचे पडसाद अनेक गोष्टींवर दिसून येतात - ढासळणारे जीवनमान, सरकारी घोटाळे, किमान सुविधांची गैरसोय, आणि एकंदरीतच 'कायद्याचे राज्य' असण्याचा अभाव, या सर्वांमुळे लोकशाही लयाला जाण्यास सुरुवात होते.

भारतीय मतदार काळजीपूर्वक आणि कर्तव्यभावनेने आपला मताधिकार बजावतात, पण त्यांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी आपली जबाबदारी त्याच निष्ठेने पार पाडतात असे खात्रीपूर्वक म्हणता येणार नाही. पण असे सरसकट विधान करायचे नसेल तर निश्चित निकषांच्या आधारे आपल्या लोकप्रतिनिधींच्या कामगिरीचे मूल्यमापन केले पाहिजे. अशा प्रकारे, त्यांच्या संविधानिक जबाबदाऱ्यांच्या आधारे लोकप्रतिनिधींच्या कामाचे मूल्यांकन निकष सध्या तरी अस्तित्वात नाहीत. म्हणूनच, प्रजा फाउंडेशनने लोकप्रतिनिधींचे प्रगती पुस्तक तयार करण्यासाठी गुणांकन प्रक्रिया तयार केली.

ही मूल्यांकन प्रक्रिया निष्पक्ष आहे. म्हणूनच आपली लोकशाही व्यवस्था अधिक सक्रिय व्हावी असे ज्यांना ज्यांना वाटते, त्या प्रत्येकाने या मूल्यांकनाचे निष्कर्ष समजून घेतले पाहिजेत.

(दिवंगत) बी.जी. देशमुख,
भाप्रसे (निवृत्त) माजी कॅबिनेट सचिव, भारत सरकार,
माजी अध्यक्ष, प्रजा फाउंडेशन

(प्रजातर्फे 2011 मध्ये प्रकाशित मुंबईतील आमदारांचे प्रगती पुस्तक या प्रकाशनातील अंश)

प्रगती पुस्तकाची गरज का आहे आणि त्यात कोणकोणत्या गोष्टी समाविष्ट आहेत?

गेल्या तीन दशकांच्या काळात राज्यकारभाराचा दर्जा सतत खालावत गेला आहे. याची विविध कारणे आहेत, पण त्यातील मुख्य दोन कारणे म्हणजे राजकारणाचे व्यापारीकरण आणि गुन्हेगारीकरण. यामुळे देशभरातील कारभाराची गुणवत्ता घसरल्याचे आपण पाहात आहोत.

मतदारांनी आपल्या लोकप्रतिनिधींच्या कामाचा आढावा केवळ निवडणुकीच्या वेळी घेऊन उपयोगी नाही, तर त्यांच्या कार्यकालात सातत्याने त्यांच्या कामाचे मूल्यांकन होत राहिले पाहिजे. परंतु अशा प्रकारे विद्यमान लोकप्रतिनिधींच्या कामाचा आढावा घ्यायला जी माहिती पाहिजे ती उपलब्ध होत नाही, त्यामुळे लोकप्रतिनिधी म्हणून ते उत्तरदायी करण्यात अडथळे निर्माण होतात. म्हणजेच, लोकप्रतिनिधींच्या कामाविषयी सातत्याने संवाद झाला पाहिजे, त्याचे मूल्यमापन झाले पाहिजे.

लोकप्रतिनिधींची संविधानिक भूमिका आणि जबाबदारी तसेच मतदारसंघातील जनतेच्या अपेक्षा यांच्या आधारे प्रजाचे प्रगती पुस्तक तयार केले जाते. मुंबई महानगरपालिकेतील 227 नगरसेवकांच्या कामाचा आढावा या प्रगती पुस्तकातून घेतला गेला आहे.

आपले नागरिक, लोकप्रतिनिधी, राजकीय पक्ष आणि शासन यांना विद्यमान लोकप्रतिनिधींची कामगिरी कशी आहे याचा महत्त्वपूर्ण प्रतिसाद या प्रगती पुस्तकातून समजून येईल, अशी आम्हाला आशा आहे. केवळ मुंबईतीलच नव्हे तर देशभरातील लोकप्रतिनिधींच्या कामगिरीचा दर्जा आणि मापदंड निश्चित करण्यास या प्रगती पुस्तकाची मदत होईल, अशीही आशा आहे.

कार्यपद्धती

या मूल्यांकनासाठी प्रजाने एक मोजपट्टी तयार केले. यासाठी राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मार्केट रिसर्च आणि माध्यमे या विषयातील तज्ज्ञ मान्यवरांची मदत घेतली. लोकप्रतिनिधींची वर्तमान कामगिरी आणि भूतकाळातील कामगिरी (निवडणुकीपूर्वी) या दोन्हीचा विचार या मूल्यांकन मोजपट्टी मध्ये केलेला आहे. जनतेची आपल्या लोकप्रतिनिधीबद्दल काय मते आहेत, तेही यामध्ये जाणून घेतले आहे.

लोकप्रतिनिधींची वर्तमानकाळातील व भूतकाळातील माहिती संकलित करण्यासाठी खालील शासकीय स्त्रोत वापरले:

अ. निवडणूक आयोग कार्यालय , बृहन्मुंबई महानगरपालिका
ब. माहिती अधिकाराखाली महापालिका सचिव, बृहन्मुंबई महानगरपालिका (महापालिका मुख्यालय आणि बेस्ट)
क. माहिती अधिकार कायद्याखाली सहाय्यक अभियंता यांच्याकडून माहिती (परिरक्षण), बृहन्मुंबई (महापालिकेचे 24 प्रशासकीय वॉर्डमधून)
ड. माहिती अधिकार कायद्याखाली मुंबई पोलिस कार्यालयाकडून माहिती

लोकमताचा अंदाज घेण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आले आणि त्याआधारे संबंधित नगरसेवकांच्या कामगिरीबद्दल नागरिकांना काय वाटते हे जाणून घेतले.

खालील निकषांच्या आधारे नगरसेवकांचे गुणांकन करण्यात आले -

1) वर्तमान (एकूण 63 गुण)

अ: महापालिका आणि समिती बैठकांमध्ये उपस्थिती (15 गुण)

आपल्या संबंधित सभागृहांच्या कामकाजात 100% किंवा त्याच्या जवळपास उपस्थिती असणे हे कार्यक्षम लोकप्रतिनिधीचे लक्षण आहे. त्यामुळे उपस्थिती हा गुणांकनाचा एक निकष ठेवलेला आहे. 100% उपस्थितीसाठी '15' गुण, तर 0% साठी '0' गुण दिले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत प्रत्येक नगरसेवक जसे महापालिका सभागृहाचे सदस्य असतात तसेच ते विशिष्ट वॉर्ड समित्यांचेही सदस्य असतात, तर काही सदस्य याखेरीज विविध कार्यकारी समित्यांचे सदस्य असतात.

म्हणजेच, नगरसेवकांमध्ये कामकाजाच्या उपस्थितीसंदर्भात खालीलप्रमाणे दोन प्रकार आहेत आणि या प्रत्येकाचे 15 गुणांचे वितरण वेगवेगळे आहे:

नगरसेवक	श्रेणी अ	श्रेणी ब
महानगरपालिका सर्वसाधारण सभा	9	7
वॉर्ड समिती बैठका	6	4
विविध कार्यकारी समिती बैठका	लागू नाही	4
एकूण	15	15

2) विचारलेल्या प्रश्नांची संख्या (10 गुण)

आपल्या देशातील समस्यांची विविधता आणि गुंतागुंत लक्षात घेता, लोकप्रतिनिधींनी अधिकाधिक शक्य तितके प्रश्न उपस्थित करणे जरूरीचे आहे. म्हणूनच नगरसेवकांना प्रश्न विचारण्यास प्रवृत्त करण्यासाठी गुणांकनासाठी पर्सेंटाईल पद्धती वापरली आहे.

ग्रुप पर्सेंटेज रॅंक नुसार गुणांकन केले आहे:
सर्वाधिक पर्सेंटाईल 10 आणि सर्वात कमी 0 आहे.

क: चर्चेत सहभाग (5 गुण)

सभागृहातील अन्य सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवरील चर्चा किंवा महापालिका आयक्तांकडून आलेल्या प्रस्तावांवर महापालिकेत जेव्हा चर्चा होते, तेव्हा त्यात प्रत्येक नगरसेवकाने सहभागी होणे महत्त्वाचे आहे. या चर्चेची नोंद सर्वसाधारण बैठकीच्या इतिवृत्तामध्ये संबंधित नगरसेवकाच्या नावासह होते. सर्वाधिक पर्सेंटाईल 5 आणि सर्वात कमी 0 आहे.

ड: प्रश्नातून उठलेली समस्या, विषय या अनुषंगाने त्याचे महत्व (18 गुण)

मुंबई महानगरपालिका कायदा, 1888 या कायद्याने नगरसेवक पदाची कर्तव्ये स्पष्ट केली आहेत. ही कर्तव्ये दोन प्रकारात विभागलेली आहेत - अनिवार्य / बंधनकारक कर्तव्ये (कलम 61, 62) आणि स्वेच्छाधिन कर्तव्ये (कलम 63). अनिवार्य / बंधनकारक कर्तव्यांमध्ये रस्ते, पाणी पुरवठा, मलनि:स्सारण, बांधकामे, आपत्ती व्यवस्थापन, महापालिका आस्थापना, प्राथमिक शिक्षण, आरोग्य इत्यादींचा समावेश होतो. स्वेच्छाधिन कर्तव्यांमध्ये झोपडपट्टी विकास, खुल्या जागा, उद्याने, रस्ते परिवहन, ऊर्जा, वीज इत्यादींचा समावेश होतो.

गुणांकनासाठी आम्ही अनिवार्य कर्तव्यातील आवश्यक नागरी सुविधांसंबंधीची कर्तव्ये याठिकाणी विचारात घेतली आहेत. मुंबईतील नागरिकांसाठी या सुविधांची पूर्तता करणे ही केवळ महानगरपालिकेचीच जबाबदारी आहे. या सुविधांसंबंधीचे प्रश्न पुढील विषयांतर्गत येतात - नाली, रस्ते, पाणी पुरवठा, घन कचरा व्यवस्थापन इत्यादी.

याखेरीज असे विषय, जे थेट महानगरपालिकेशी संबंधित नाहीत, तर राज्य वा केंद्र सरकारशी संबंधित आहे, अशांविषयीही नगरसेवक प्रश्न उपस्थित करू शकतात. जसे की, गुन्हेगारी, परराष्ट्र धोरण, शेती, पशुपालन, एमएमआरडीए इत्यादी.

वरील वर्गवारीच्या आधारे प्रश्नांचा दर्जा / महत्त्व ठरवून त्यांचे गुण खालीलप्रमाणे ठरवले आहेत:

मुद्दे / कर्तव्ये	गुण
आवश्यक	8
स्वेच्छाधीन	6
नागरी (आवश्यक)	3
राज्य / केंद्र	1
एकूण	18

ई: नागरिकांच्या तक्रारीच्या तुलनेत मांडलेल्या समस्यांचे प्रमाण (10 गुण):

बृहन्मुंबई महानगरपालिकेने नागरिकांच्या तक्रारी नोंदवण्याची आणि त्यांचे ट्रॅकींग करण्याची व्यवस्था निर्माण केली आहे. 'केंद्रीत तक्रार नोंदणी सुविधा (सीसीआएस)' यामध्ये नागरिकांच्या तक्रारींची नोंद व जतन होते. या सॉफ्टवेअरमध्ये नोंदवलेल्या तक्रारींची त्यांच्या विषयानुसार - रस्ते, नाली, पाणी पुरवठा, कॉलनी ऑफीसर, बांधकाम इत्यादी - आणि तक्रारीच्या स्वरूपानुसार वर्गवारी होते. या नागरिकांनी स्वत:हून नोंदवलेल्या तक्रारी असल्याने, लोकप्रतिनिधी या नात्याने नगरसेवकांनी या नागरिकांच्या समस्या सभागृहात योग्य प्रकारे मांडल्या व उठवल्या पाहिजेत. त्यामुळे नागरिकांच्या समस्यातील किती समस्या नगरसेवकांनी उठवल्या याबाबत गुण दिले गेले आहेत. याबाबतची माहिती सीसीआरएसकडून माहिती अधिकार कायद्याखाली घेण्यात आली. या घटकासाठी सर्वाधिक गुण 10 आहेत.

फ: नगरसेवक निधीचा वापर (5 गुण)

नगरसेवकांना प्रत्येक आर्थिक वर्षात 60 लाख रूपये निधी मिळतो. विशिष्ट बांधकाम सुविधांसाठी आपल्या मतदारसंघात त्यांना स्वमताने या निधीचा वापर करता येतो. नगरसेवकांनी जर 100% (किंवा अधिक)-91%, 90% ते 76%, किंवा 75% ते 61% निधी वापरला तर त्यांना अनुक्रमे 5, 4 व 3 गुण दिले आहेत. जर 60% ते 51% किंवा 50% पेक्षा कमी निधीचा वापर केलेला असेल तर अनुक्रमे 2 आणि 0 असे गुण दिले आहेत.

2) भूतकाळ (एकूण 7 गुण)

अ: शैक्षणिक पात्रता (1 गुण)

जर लोकप्रतिनिधीने आपल्या शपथपत्रात दिलेली शैक्षणिक पात्रता इयत्ता 10 किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर 1 गुण दिला जातो. मानवी विकासासाठी आधुनिक शिक्षण घेतलेले असणे आवश्यक आहे. तसेच कित्येक व्यवसायांसाठीही किमान शैक्षणिक पात्रतेला महत्त्व दिले जाते. परंतु शिक्षणापेक्षाही अन्य घटक कामगिरीवर अधिक प्रभाव टाकत असतात, त्यामुळे मूल्यमापन निकषांमध्ये इतर घटकांपेक्षा शिक्षणाला कमी महत्त्व जाणीवपूर्वक देण्यात आले.

ब: आयकर (1 गुण)

व्यक्ती एकदा निवडून आली की तिच्या मालमत्तेत अनेक पटीने वाढ होते, असा भारतीयांचा समज आहे, आणि तसे दिसूनही येते. पॅन कार्ड आहे, असे शपथपत्रात जाहीर केलेले असल्यास 1 गुण आहे, नसल्यास 0 गुण आहेत.

क: गुन्हेगारी पार्श्वभूमी (5 गुण)

राजकारणाचे गुन्हेगारीकरण हे एक कटू वास्तव आहे. निवडून आलेल्या बऱ्याच लोकप्रतिनिधींची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. म्हणजे,

1) त्यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल झाले आहेत;
2) आरोपपत्र दाखल झाले आहेत; आणि
3) काहींना न्यायालयाने सजाही सुनावलेली आहे.

सार्वजनिक जीवनात सक्रिय असणाऱ्या व्यक्तींनी नैतिक सचोटीचे पालन केलेच पाहिजे. आपले प्रतिनिधित्व करणारे लोकप्रतिनिधी गुन्हेगारी पार्श्वभूमी असता कामा नयेत, हाही नागरिकांचा अधिकार आहे.

1. गुन्हेगारी एफआयआर नोंद अजिबात नसलेल्यांना 5 गुण दिले आहेत.
2. खून, बलात्कार, लैंगिक अत्याचार, दंगल आणि खंडणीखोर अशा गुन्ह्यांखाली एफआयआर दाखल झाले असल्यास, 0 गुण दिले आहेत.
3. वरील गुन्ह्यांखेरीज इतर कारणांसाठी ज्यांच्यावर एफआयआर दाखल झाले असल्यास, 3 गुण दिले आहेत.

3) लोकमत (एकूण 30 गुण)

लोकप्रतिनिधींच्या कामगिरीबद्दलचे लोकांचे मत याला 30 गुण दिले आहेत. कामगिरीचे मूल्यांकन तपशीलवार पद्धतीने व्हावे यासाठी या गुणांचे 4 भागात विभाजन केले आहे:

- सार्वजनिक सेवांबद्दलचा दृष्टीकोन (संबंधित भागातील सुविधांबद्दल लोकांचे मत काय आहे) याला 11 गुण दिले आहेत
- नगरसेवकाबद्दलची माहिती/ जागरुकता आणि पोहोच यांना 5 गुण दिले आहेत
- भ्रष्टाचार विषयक 7 गुण दिले आहेत, आणि
- सर्वसाधारण उपाययोजनांसाठी 7 गुण दिले आहेत.

एखाद्या भागातील सुविधा आणि भ्रष्टाचार विषयक यांना लोकांचे सर्वसाधारण मत अथवा नगरसेवकांची माहिती / पोहोच यापेक्षाही अधिक गुण दिले आहेत. कारण सर्वसाधारण अनुकूल मत असणे किंवा लोकसंपर्क चांगला असणे हे प्रभावी काम करण्यासाठी आवश्यक पायरी आहे. त्यामुळे प्रत्यक्ष कामावर अधिक भर देणे अधिक आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे सुविधांसाठीचे मत जाणून घेतल्यानंतर संबंधित सुविधा या स्थानिक स्वराज्य संस्थेतून झालेल्या आहेत की राज्य / केंद्र सरकारी योजनेचा भाग म्हणून झाल्या आहेत हे तपासणे महत्त्वाचे होते. म्हणूनच सार्वजनिक सुविधांबद्दलचे लोकमत पुढीलप्रमाणे 3 पातळ्यांमध्ये विभागले आहे.

पहिली पातळी, यामध्ये जीवनावश्यक आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अखत्यारितील सुविधांचा समावेश होतो आणि तिसरी पातळी म्हणजे जीवनावश्यक आणि राज्य शासनाच्या अखत्यारितील सुविधा.

पहिली पातळी : या पातळीमध्ये रस्त्यांची स्थिती, वाहनांची गर्दी आणि ट्रॅफीम जॅम, सार्वजनिक उद्यानांची उपलब्धता, सार्वजनिक परिवहन सेवांची उपलब्धता, पाणी पुरवठा, पाणी निस्सारण, स्वच्छता आणि शौचालय सुविधांची उपलब्धता यांचा समावेश केला असून याला 6 गुण दिले आहेत.

दुसरी पातळी : या पातळीमध्ये रूग्णालये आणि वैद्यकीय सुविधा, शाळा आणि महाविद्यालये यांचा समावेश केला असून याला 4 गुण दिले आहेत.

तिसरी पातळी : या पातळीमध्ये वीज पुरवठा, कायदा व सुव्यवस्था व गुन्हेगारी यांची स्थिती यांचा समावेश केला असून याला 1 गुण दिले आहेत.

संशोधन आराखडा:

हा अभ्यास नगरसेवकांची कामगिरी जाणून त्याचे मूल्यांकन करण्याचा असल्याचे सर्व नगरसेवकांचे वॉर्ड यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक होते. त्यादृष्टीने सर्व 227 महापालिका प्रभाग निवडण्यात आले व प्रत्येक प्रभागातील 100 नागरिकांचा प्रतिसाद घेण्यात आला. या शंभर व्यक्तींची, म्हणजेच अभ्यासाच्या लक्ष्यगटाची निवड खालील निकषांवर करण्यात आली

- स्त्री व पुरुष दोघांचा समावेश
- 18 वर्ष व त्यापेक्षा जास्त वयाच्या (मतदानास पात्र) व्यक्ती

एकदा लक्ष्यगट निश्चित केल्यानंतर स्त्री-पुरुष आणि प्रत्येक वयोगटातील व्यक्तींचे प्रतिनिधित्व राहील अशा प्रकारे नमुना संख्येचा कोटा ठरवला.

- मुंबई विभागासाठी इंडियन रीडरशीप सर्व्हे (मिडिया रिसर्च युजर्स कॉन्सिल यांचा बेसलाईन स्टडी)) आणि हंसा रिसर्च ग्रुप यांनी केलेल्या अभ्यासावर आधारित स्त्री-पुरुष आणि प्रत्येक वयोगट निहाय कोटा निश्चित केला.
- प्रश्नावलीच्या आधारे व्यक्तीश: मुलाखती घेऊन माहिती संकलन केले गेले.

अभ्यासासाठी ज्यांच्या मुलाखती घेतल्या त्यांची नमुना निवड खालील प्रकारे केली गेली:

- प्रत्येक महापालिका विभागात 100 मुलाखती घेण्यात आल्या.
- वॉर्डमधील 2-3 मुख्य भाग निवडले आणि त्यांच्यामध्ये नमुना संख्या विभागली. बाजारपेठा, रेल्वे स्टेशन, मॉल इत्यादी गर्दीचे भाग निवडण्यात आले.
- नमुना निवडीत आयआरएस बेसलाईन डाटाच्या आधारे मिळालेल्या माहितीशी अनुरूप वयोगट आणि स्त्री-पुरुष प्रमाण ठेवण्यात आले.

4) नकारात्मक गुणकांचे घटक

नव्याने दाखल झालेल्या एफआयआर साठी नकाराम्त्मक गुणांकन (-5 गुण)

निवडून आल्यानंतर जर नगरसेवक व्यक्तीवर नवा एफआयआर नोंदवला असेल तर त्याच्या / तिच्या गुणातून 5 गुण कमी करण्यात आले.

आरोपपत्र दाखल झाल्याने नकारात्मक गुणांकन (-5 गुण)

आरोप पत्र हा घटनेचा प्रथमदर्शनी पुरावा समजण्यात येतो. त्यामुळे असे झाल्यास लोकप्रतिनिधीकडून ते सार्वजनिक सचोटीचे उल्लंघन आहे. यामुळे, असे आढळल्यास त्याच्या / तिच्या गुणातून 5 गुण कमी करण्यात आले.



(टीप: 2012 या वर्षात निवडणूक होवून सर्व नगरसेवक नव्याने निवडून आले, त्यामुळे या वर्षी प्रजाने कामगिरीचे मूल्यांकन केले नाही.)

वरील आलेखात दिसून येत आहे त्याप्रमाणे गेल्या वर्षी नगरसेवकांची कामगिरी सुधारली आहे आणि ही सकारात्मक गोष्ट आहे. प्रजाचे प्रगती पुस्तकाच्या माध्यमातून होणारे मूल्यांकन अनेकविध निकषांवर आधारित आहे: नगरसेवकांची वर्तमान कामगिरी आणि बैठकांतील सहभाग यापासून, आणि पारदर्शकता आणि नैतिक सचोटी दर्शवणारी भूतकाळातील कामगिरी यांच्यासह संबंधित मतदारसंघातील नागरिकांची लोकप्रतिनिधीच्या कामगिरी, प्रतिमा आणि नागरी सुविधांचा दर्जा याविषयीची मते जाणून घेण्यापर्यंत. लोकप्रतिनिधींच्या कामगिरीचा प्रत्येक पैलू विचारात घेतले जावेत असा प्रयत्न या अभ्यासातून केला आहे. गुणांकन प्रक्रिया सर्वंकष आणि वस्तुनिष्ठ आहे. जर या सर्व मोजपट्टी निकषांवर नगरसेवकांनी चांगले गुण संपादित केले तर ते सक्षम लोकशाहीचे लक्षण राहील.

पुढील अंक: मुंबईतील नागरी समस्या आणि नगरसेवकांनी त्यावर केलेली चर्चा व विचारविनिमय या विषयावरील अधिक माहितीसाठी एप्रिल 2017 चा अंक जरूर वाचा.

To _____

प्रजा फाऊंडेशन
पहिला मजला, विक्टोरिया बिल्डींग, एगीयारी लेन,मिंट रोड, फोर्ट, मुंबई 400 001
फोन: 022-2261 8042, 6525 2729 वेबसाईट: www.praja.org, ईमेल: info@praja.org

PRAJA.ORG
MAKING DEMOCRACY WORK

प्रजा फाऊंडेशनला निधीसाहाय्य देताना 'प्रजा फाऊंडेशन' या नावाने चेक काढावेत आणि प्रजा ऑफिसला पाठवावेत. सोबत आपले नाव, ईमेल व इतर संपर्काचे तपशील पाठवावेत. त्यामुळे आमच्या कामाची माहिती व कर सवलतीसाठीचे 80जी प्रमाणपत्र नियमित मिळू शकेल.

Supported by
European Union
dasra
Friedrich Naumann STIFTUNG FÜR DIE FREIHEIT
Narotam Sekhsaria Foundation
TATA TRUSTS
SIR DORABJI TATA TRUST • SIR RATAN TATA TRUST
JAMSETJI TATA TRUST • N.R. TATA TRUST • J.R.D. TATA TRUST

AGN 9881231865